लोकमत

# भारतीयांना जर्मनीत चांगल्या संधी : मोरहार्ड

लोकमत न्यूज नेटवर्क

◆ वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या सहसंचालक डॉली आवटी यांनी वर्ल्ड ट्रेड सेंटरची संकल्पना स्पष्ट केली. त्यात त्यांनी न्यूयॉर्क नेटवर्कमध्ये २३२ सेंटर असल्याचे सांगून, त्यात ८८ देशांच्या २५ हजार उद्योजक सदस्यांचा समावेश असल्याचे स्पष्ट केले. आतापर्यंत या सेंटर्सच्या माध्यमातून ७५ हून जास्त प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, वर्षभरात ६0हून जास्त परदेशी शिष्टमंडळांनी भेट दिल्याचे सांगितले.

**सातपूर :** जर्मनीत ८५ टक्के लघु उद्योग असून, त्यात ८० टक्के गृहउद्योग आहेत. भविष्यात भारतीयांना जर्मनीत चांगल्या संधी निर्माण होणार असल्याने जर्मनी आणि भारत हे नैसर्गिक भागीदार होऊ शकतात, असे प्रतिपादन जर्मनीचे मुंबईतील कॉन्स्युलेट जनरल डॉ. जुर्गन मोरहार्ड यांनी केले.

निमा हाऊस येथे वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या वतीने वर्ल्ड ट्रेड सेंटर डेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना मोरहार्ड यांनी सांगितले की, भविष्यात जर्मनीत भारतीय उद्योगांना मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. जर्मनीतील लघु उद्योग टेक ओव्हर करण्याची संधी भारतीय उद्योजकांना मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी इइपीसी मुंबईचे विभागप्रमुख रजत श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमेरिका किंवा युरोपकडे जाण्यापेक्षा आशियाई देशात उद्योग व्यवसायाच्या संधी अधिक आहेत. आशियाई देश खूप सवलती देत आहे त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी एबीबीचे कंपनीचे उपाध्यक्ष गणेश कोठावदे, ईईपीसी इंडियाचे पश्चिम विभागीय अध्यक्ष के. एल. डिंग्रा, पर्यटन विभागाचे नाशिक विभागप्रमुख नितीन मुंडावरे यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक निमाचे सरचिटणिस श्रीकांत बच्छाव यांनी केले.

पुढारी




सातपूर : निमा हाउसमध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटर-डे-इन महाराष्ट्र कार्यक्रमात उपस्थित मान्यवर. (छाया : सागर आनप)

# 'ट्रेड फेअर'मधून बाजारमूल्य समजण्याची संधी : डॉ. मोऱ्हार्ड

**सातपूर : वार्ताहर**

लघु व मध्यम उद्योग, व्होकेशनल ट्रेनिंग, ट्रेड फेअर व औद्योगिक संघटना या चार गोष्टींवर जर्मनीची अर्थव्यवस्था स्थिरावलेली आहे. त्यामुळे भारतीय उद्योगांना जर्मनीतील बाजारपेठ मूल्य समजावून घेण्याची ही योग्य वेळ आहे. त्या माध्यमातून व्यवसायाच्या नवनवीन संधी शोधतानाच उत्पादनातील योग्य भागीदारही शोधण्याची संधी या ट्रेड फेअरच्या माध्यमातून उद्योजकांना मिळणार असल्याचे जर्मनीचे मुंबईतील कॉन्स्यूलेट जनरल डॉ. जुर्गन मोऱ्हार्ड यांनी सांगितले.

निमा हाउस येथे वर्ल्ड ट्रेड सेंटर-डे-इन महाराष्ट्र कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'जागतिक स्तरावरील व्यवसायाच्या संधी' या विषयावर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर जर्मनीचे मुंबईतील कॉन्स्यूलेट जनरल डॉ. जुर्गन मोऱ्हार्ड यांच्यासह एबीबीचे उपाध्यक्ष गणेश कोठावदे, ईईपीसी इंडियाचे पश्चिम विभागीय अध्यक्ष के. एल. डिंग्रा, ईईपीसी मुंबईचे विभागप्रमुख रजत श्रीवास्तव, पर्यटन विभागाचे नाशिक विभागप्रमुख नितीन मुंडावरे, निमा सरचिटणीस श्रीकांत बच्छाव उपस्थित होते.

यावेळी वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या सहसंचालक डॉली आवटी यांनी वर्ल्ड ट्रेड सेंटरची संकल्पना स्पष्ट केली.

त्यात त्यांनी न्यूयॉर्क नेटवर्कमध्ये २३२ सेंटर असल्याचे सांगून, त्यात ८८ देशांच्या २५ हजार उद्योजक सदस्यांचा समावेश असल्याचे सांगितले. आतापर्यंत या सेंटर्सच्या माध्यमातून ७५ हून जास्त प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, वर्षभरात ६० हून जास्त परदेशी शिष्टमंडळांनी भेट दिल्याचे सांगितले. भूषण यांनी सूत्रसंचालन केले. तर श्रीकांत बच्छाव यांनी आभार मानले. यावेळी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.